# ' ब्रिक्स पुढील आव्हाने आणि ब्रिक्समधील भारताची भूमिका '

**कुणाल दिलीप राठोड**, ( डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय,कळमनुरी जिल्हा: हिंगोली)
(सहाय्यक प्राध्यापक CHB राज्यशास्त्र विभाग) मो.नं.: 8975763259 ई-मेल:kunal2sonu@gmail.com

---

गोषवारा :

"ब्रिक्स" (इंग्लिश: BRICS ) हे भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या शिखर संघटनेचे संक्षिप्त नाव आहे. सुरुवातीला फक्त चार देश या संघटनेचे सदस्य होते आणि "ब्रिक" (BRIC) या संक्षिप्त नावाने ओळखले जात होते. २०१० मध्ये दक्षिण आफ्रिका समाविष्ट झाल्यावर संघटनेचे नाव ब्रिक्स झाले. जगाच्या नकाशावर ब्रिक्स गटातील देशांची अर्थव्यवस्था वृद्धिंगत होण्यासाठी निधी उपलब्ध करणे , परस्परांतील आर्थिक सहकार्य वाढवणे , आर्थिक सुरक्षितता मजबूत करणे , इत्यादी या संघटनेची उद्दिष्ट व कार्ये आहेत.

**प्रस्तावना :**

ब्रिक्स हा पाच उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशाची मिळून बनलेली संघटना आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक क्षेत्रात सहयोग, नीती समन्वय आणि राजकीय संवादाला प्रोत्साहन देणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे. गोल्डमन सॅक्स या बलाढ्य बँकेचे जिम ओनील यांनी पहिल्यांदा 'ब्रिक' हा शब्दप्रयोग केला तेव्हापासून हा समूह अमेरिका आणि युरोपीय संघटना यांना आव्हान म्हणून उभा राहणार असे मानले जाऊ लागले. हा विकसनशील देशांचा गट सध्याच्या विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांची जागा घेऊ शकतो या कल्पनेतून एकत्रिकारणाला चालना मिळाली. ब्रिक्स देशात जगाची 42 टक्के लोकसंख्या व जगाच्या जीडीपीचा 20 टक्के वाटा आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राजकीय, आर्थिक आणि वित्तीय सुधारणा घडवून आणणे व संयुक्त राष्ट्रसंघाच्या मोठ्या अर्थव्यवस्थांकडे झुकलेला तोल सुधारणे आणि जागतिक चलन पद्धतीला नव्याने ढाळून तिचे डॉलर वरील अवलंबित्व कमी करणे हे ध्येय स्वतः पुढे ठेवले आहे. या देशांनी आपले द्विपक्षीय संबंध समानता आणि परस्पर फायदा या तत्त्वांवर आधारित ठेवले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

ब्रिक्स मधील देशांच्या सामाजिक व आर्थिक सहकार्याचा अभ्यास करणे.

1) ब्रिक्स मधील नवीन विकास बँकेचे विश्लेषण करणे.
2) भारताचे चीन सोबत वाढलेले संबंध, अमेरिकेसोबतची वाढती भागीदारी आणि रशिया-चीन मधील संबंधाच्या पार्श्वभूमीवर भारताची ब्रिक्स मधील भूमिका तपासणे.
3) ब्रिक्स देशांचा दहशतवाद विरोधातील एक समान धोरण अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन, संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**आशय विश्लेषण :**

ब्रिक्स हा ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समूह आहे. गोल्डमन सॅक्स या बँकेचे जिम ओनील यांनी पहिल्यांदा 'ब्रिक' हा शब्दप्रयोग केला आणि तेव्हापासून देशसमूह अमेरिका व युरोपियन संघटना अशांना आव्हान म्हणून उभा राहणार असे मानले जाऊ लागले. जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थांना आव्हान देताना कोणी दिसले तर अनेक जण आपापल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी पुढे येतात त्यामुळे मूळच्या ब्रिक या संघटनेत दक्षिण आफ्रिका येऊन मिळाली आणि ही संघटना 'ब्रिक्स' म्हणून ओळखला जाऊ लागली. 2009 संघटनेची परिषद या संघटनेचे पहिली परिषद झाली. अशा प्रकारच्या आतापर्यंत 12 परिषदा संपन्न झाल्या आहेत. या वर्षांमध्ये ब्रिक्स देशातील सहकार्याच्या विस्तार बैठका भागधारकांची संख्या आणि अजेंडा यांच्या दृष्टीने झाल्या आहेत. त्यात आतापर्यंत शंभरहून अधिक क्षेत्रीय बैठकांचाही समावेश आहे. ज्यात तीन स्तरीय संवादांतर्गत देशांच्या औपचारिक राजनईकांचा संवाद, सरकारशी संबंधित संस्थांचा संवाद आणि लोकसंवाद यांचा समावेश आहे. ब्रिक्स मधील सहकार्य मजबूत करण्यासाठी व वाढवण्यासाठी जुलै 2015 मध्ये उफा शिखर परिषदेदरम्यान ब्रिक्स आर्थिक भागीदारी धोरण स्वीकारण्यात आले. यात आता व्यापार आणि गुंतवणूक, उत्पादन आणि खनिज प्रक्रिया, ऊर्जा, कृषी क्षेत्रात सहकार्य, विज्ञान-तंत्रज्ञान, आर्थिक सहकार्य, कनेक्टिविटी,

आयसीटी सहकार्य आणि बहुपक्षीय प्रादेशिक संघटनांमध्ये समन्वय या सहकार्याच्या सर्व क्षेत्रांचा समावेश आहे. अमलात आल्यापासून पाच वर्षात ब्रिक्सने भागीदारी अंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये विविध स्तरांवर आपले सहकार्य वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. या दिशेने विविध चर्चासत्रे, कार्यशाळा आणि बैठका नियमितपणे आयोजित केल्या गेल्या. शिक्षणाच्या मुद्द्यावर ब्रिक्स नेटवर्क युनिव्हर्सिटीज ज्याची उद्दिष्टे 5 देशांमधील प्रत्येकी 12 विद्यापीठांना शिक्षणातील संशोधन क्षेत्रात नावीन्यपूर्ण विषय समाविष्ट करणे आहे. हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे या अंतर्गत 5 क्षेत्रात सहकार्याला प्राधान्य देण्यात आले आहे. या मध्ये दळणवळण, आयटी, अर्थशास्त्र, हवामानबदल, जलस्रोत प्रदूषण आणि ब्रिक्स संघटनेचा अभ्यास यांचा समावेश आहे.

ब्रिक्स देशांनी एकत्र येऊन डरबन येथील बैठकीत ब्रिक्स देशांची म्हणून एक बँक स्थापन करण्याच्या निर्णयास तत्वतः मान्यता देण्यात आली होती. जागतिक बँक व नाणेनिधी यात सुधारणा करण्याची मागणी अनेक वर्षे लावून धरुणही यश आले नाही. यासंदर्भात जागतिक बँकेचे उदघाटन आठवणे समर्पक आहे, दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस ब्रेटन वूड्स येथील परिषदेत जागतिक बँकेचा जन्म झाला तोच मुळी अमेरिकेने भांडवलातील मोठा वाटा उचलण्याची तयारी दाखवल्यावर. या परिस्थितीत आजही फरक झालेला नाही. त्यामुळे जागतिक बँकेच्या नावात जरी 'जागतिक' हा शब्द असला तरी ती बँक प्रामुख्याने चालते ती अमेरिकेच्या इशाऱ्यावर हे नाकारण्यात अर्थ नाही. इतकेच काय तर या बँकेचे आतापर्यंतचे 13 अध्यक्ष हे अमेरिकेचेच होते. ब्रिक्स देशांच्या डरबनच्या परिषदेत या बँकेच्या जोडीला 100 अब्ज डॉलर्सचा निधी उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. बँकेसाठी तितकेच भांडवल अपेक्षित असून सध्याची परिस्थिती अशी आहे की एक चीन सोडला तर ब्रिक्स देशांपैकी कोनाहीकडे इतके पैसे गुंतवण्यासाठी अतिरिक्त भांडवल नव्हते. हा निधी एकमेकांमधील व्यवहारात चलनयुद्धामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी उभा केला जाणार होता. या निधीसाठीही मूळचे भागभांडवल उभे करण्यासाठी चीनने पुढाकार घेतला होता. यातील 41% निधी चीन या एकाच देशाकडून आला आणि बाकीचे नावापुरती आपली जबाबदारी पार पाडली. या खेरीज बँकेत 100 अब्ज डॉलर्स इतके भांडवल असणार होते. त्यात सर्व देश एकमेकांच्या चलनाला प्राधान्य देतील. बँकेचे मुख्यालय शांघाय येथे असून पाहिले प्रमुख म्हणून भारताचे के. व्ही. कामात यांची निवड झाली होती.

जशा सहकार्याच्या शक्यता आहेत तशाच संघर्षाच्या शक्यताही आहेत. ब्रिक्स मधील तीन देश लोकशाही आहेत, रशिया व चीन हे हुकूमशाही देश आहेत. यादेशांची अर्थव्यवस्था आजही राज्य भांडवलदार या पद्धतीने चालविले जाते. या देशातील मोठे उद्योग हे सरकारी मालमत्ता आहेत चीनकडे जगातील सर्वाधिक मोठा परकीय चालनसाठा आहे जो इतर देशांना भारी पडू शकतो. भारत, ब्राझील व दक्षिण आफ्रिका यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व हवे आहे. रशिया व चीनकडे ते आधीच आहे ते इतर तिघांच्या प्रवेशाला जाहीर विरोध करीत नसले तरी फारसे अनुकूल देखील नाहीत. चीन विषयी बोलायचे झाले तर आपल्याला असलेला धोका अधिक आहे एकतर चीन बरोबर असलेला आपला सीमा लढा निर्णायकरित्या संपलेला नाही. अरुणाचल आदी भागांवर हक्क सांगण्याचा प्रकार चीनकडून अधूनमधून होत असतोच त्या जोडीला आपल्या सर्व शेजारी देशांना चीनने व्यापारी जाळ्यात ओढलेले आहे. श्रीलंकेचे आणि आपले संबंध तामिळ इलमच्या प्रश्नावर ताणले गेले आहे त्यामुळे तेथे चीनने भारताच्या मार्गात पाचर मारून ठेवलेली आहे. बांग्लादेशनेही आपल्यापेक्षा चीनला जवळचे मानले आहे. म्यानमार आणि परिसरात तर चीनची उपस्थिती लक्षणीय आहे आणि तो देश तिबेटवरील आपली पकड जराही सैल करू देणार नाही हे ही स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत या संघटनेत इंडोनेशियादेखील येऊ पाहत आहे त्यामुळे मूळचे ब्रिक या नावाचे रूपांतर 'ब्रिक्सी' या नावात होईल परंतु त्यामुळे परिस्थिती बदलणार नाही. या नव्या संघटनेचे तळे राखण्याची जबाबदारी प्रामुख्याने चीनवर असेल आणि त्यामुळे त्याचे पाणी चाखायची अधिकारही चीन स्वतःकडेच ठेवेल.

भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा सामावेश असलेल्या ब्रिक्स देशांच्या अनेक बैठकीत दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी एक समान धोरण ठेवण्यासाठी मतैक्य झालेली आहेत. दहशतवादाला धर्म आणि सीमा नसते यावर जगभर सर्वसहमती असली तरी अमेरिकेसह अनेक देश आपल्या सोईच्या राजकारणासाठी दहशतवाद्यांचे चांगले आणि वाईट असे वर्गीकरण करत आले आहे. वास्तविक दाहशतवाद्यांत चांगले आणि वाईट असा भेद करता येत नाही. आपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी रक्तरंजित हिंसाचार करणारे आणि मृत्यूकांड घडवून आणणारे सर्व रंगांचे आणि तथाकथित तत्वज्ञान सांगणारे दहशतवादी मानवजातीचे शत्रूच असतात. आपल्या राजकीय समिकरणांसाठी काही दहशतवाद्यांना चांगले म्हणणे म्हणजे दहशतवादी कृत्यांना राजकीय अधिमान्यता देण्यासारखेच आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला बळी ठरलेला भारत ही भूमिका सर्व आंतरराष्ट्रीय व्यसपीठांवर जोरकसपणे

मांडत आहे त्याला आता पाठिंबाही मिळत आहे. ब्रिक्स देशांची चीनमध्ये झालेल्या परिषदेत विषयपत्रिका ठरवण्यासाठी झालेल्या बैठकीत परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. के. सिंह यांनी भारताची भूमिका आग्रहाने मांडली होती. चीन आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध दिवसेंदिवस विलक्षण मधुर होत असल्याने पाकिस्तानातील दाहशतवाद्यांकडे आणि त्यांच्या भारतविरोधी करवायांकडे चीन कानाडोळा करत आहे. जैसे-ए- मोहम्मद चा म्होरक्या मसूद अजहर याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी ठरवण्यासाठी भारत प्रयत्नशील असून अमेरिकेसह अन्य देशांनीही त्याला पाठिंबा दर्शविला आहे. मात्र संयुक्त राष्ट्रांत याबाबतच्या भारताच्या ठरवला चीनने आतापर्यंत विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर 12 व्या शिखर परिषदेत दहशतवादाच्या मुद्यावर बोलतांना नरेंद्र मोदी म्हणाले की " दहशतवादाला समर्थन आणि मदत देणाऱ्या देशांनाही दोषी ठरवलं जाईल, हेही आपण पाहायला हवं. या समस्येला आपण सगळ्यांनी मिळून सामोरे जायला हवं". दहशतवादा बरोबरच आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणण्याची गरज असल्याचंही यावेळी बोलताना मोदींनी म्हटलं.

भारताने याआधीच कोविड 19 मुळे जागतिक व्यवस्थेवर झालेला परिणाम पाहता परराष्ट्र धोरणांवर पुनर्विचार करण्यास सुरुवात केली आहे. 2021 मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद भारताकडे होते. 2021 मध्ये ब्रिक्सच्या भारताच्या अध्यक्षतेचा भाग म्हणून, पंतप्रधान नरेंद्र मोदी 9 सप्टेंबर 2021 रोजी होणाऱ्या आभासी स्वरूपातील (व्हर्च्युअल) 13 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे अध्यक्ष होते. या बैठकीला ब्राझीलचे अध्यक्ष जेर बोलेसनारो, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सायरिल रामाफोसा उपस्थित राहिले . भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, न्यू डेव्हलपमेंट बँकेचे अध्यक्ष मारकोस ट्रोयजो, ब्रिक्स व्यवसाय परिषदेचे अस्थायी अध्यक्ष ओंकार कंवर आणि ब्रिक्स महिला व्यवसाय आघाडीच्या अस्थायी अध्यक्ष डॉ. संगीता रेड्डी शिखर परिषदे दरम्यान नेत्यांना त्यांच्या क्षेत्राशी संबंधित त्याअंतर्गत या वर्षी पाठविलेल्या निकालांचे अहवाल सादर केले. त्यावेळी चिनसोबतचे तानले गेलेले संबंध, अमेरिकेसोबतची वाढती जवळीक आणि रशिया चीन मधील संबंधाच्या पार्श्वभूमीवर भारताची ' ब्रिक्स ' मधील भूमिका पाहणे अतिशय महत्वाचे असणार आहे. तसेच चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्या अध्यक्षतेखाली 23 व 24 जून 2022 रोजी व्हर्च्युअल प्रणाली द्वारे आयोजित 14 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या वतीने सहभाग नोंदवला. ब्राझीलचे राष्ट्रपती जैर बोलसोनारो, रशिया चे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती सिरील रामफोसा हे देखील या शिखर परिषदेत सहभागी झाले होते. नेत्यांनी दहशतवादाचा विमोड, व्यापार, आरोग्य, पारंपारिक औषधशास्त्र, पर्यावरण, विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी ,तांत्रिक व्यवसाय, covid-19 महामारी, जागतिक आर्थिक उभारे यासारख्या जागतिक संदर्भातील प्रमुख मुद्यांवर चर्चा केली पंतप्रधानांनी ब्रिक्सची ओळख मजबूत करण्यासाठी आणि ब्रिक्स दस्ताऐवज साठी ऑनलाइन डेटाबेस स्थापन करणे, ब्रिक्स रेल्वे संशोधन नेटवर्क आणि एमएसएमई दरम्यान सहकार्य मजबूत करण्याचे आवाहन केले.

**संदर्भ :**

1) Stephen Mathew P. - 'India and the Brics : Global bandwagoning and Reginal balancing'.
2) कपूर निवेदिता ( 1 डिसेंबर 2020 ) - 'ब्रिक्स पुढील आव्हाने आणि भारत'.
3) ' ब्रिक्स सामाजिक आर्थिक सहयोग का एक दशक ' ( 18 जून 2019 ) - icwa.in.
4) ' दहशतवाद ही जगासमोरील सर्वतमोठी समस्या ब्रिक्स परिषद ' ( 17 नोव्हेंबर 2020 ) - bbc.com.
5) ' भारत आणि ब्रिक्स नीती ' ( 21 जून 2017 ) - maharashtratimes.com
6) ' ब्रिक ब्रिक्स आणि ब्रिक्सी ' संपादकीय ( 29 मार्च 2018 ) - Loksatta.com.
7) ' ब्रिक्स ' संपादकीय ( 26 फेब्रुवारी 2016 ) - maharashtratimes.com.